**प्रेस नोट ता.१८/०५/२०२३**

**वाहन चोरी करणारा सराईत गुन्हेगार पोलीसांच्या जाळ्यात**

**सराईत गुन्हेगाराकडुन दोन महागडया किंमतीच्या मोटर सायकली हस्तगत**

**चिखली पोलीस ठाण्याकडील तपास पथकाची कामगिरी**

---

मागील तीन ते चार महिन्यांपासुन चिखली पोलीस ठाणे व पिंपरी-चिंचवड परिसरामधुन रॉयल एनफिल्ड बुलेट, के.टी.एम. पल्सर-२२०, यामाहा, होन्डा या कंपनीच्या माहागडया किंमतीच्या मोटार सायकली मोठया प्रमाणात चोरीला जात आहेत. त्यामुळे अश्या मोटार सायकल चोरीला प्रतिबंध व्हावा यासाठी उपाय म्हणुन मा. वरिष्ठांच्या निर्देशनानुसार चिखली पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर, यांनी वाहन चोरी विरोधी पथक तयार करुन त्याअनुषंगाने पोलीस ठाणेच्या हददीमध्ये नियमीत पेट्रोलींग करण्यास व बातमीदार नेमुन वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्यासाठी प्रयत्न करण्यास सुरुवात केली.

त्यानुसार आज दि.१८/०५/२०२३ रोजी वाहन चोरी विरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी श्री. राकेश गुमाने, तसेच पोलीस अमलदार पोहवा.११३३/साकोरे, पोना.९६२/राठोड, पोना.१८१३/सुतार, पोना.१८५६/पिंजारी, पोना.१५४६/गायकवाड, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर, व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र बर्गे, यांच्या मार्गदर्शनाखाली मोटर सायकल चोरीस प्रतिबंध होण्याच्या अनुषंगाने चिखली पोलीस ठाणेच्या हददीमध्ये पेट्रोलींग फिरत असताना त्यांना बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, "एक इसम कुदळवाडी, सर्कल ब्रिज खाली, स्पाईनरोड, पवार वस्ती, कुदळवाडी, चिखली, पुणे. याठिकाणी केटीएम मोटर सायकलवर फिरत असुन त्याच्याकडे असलेली मोटर सायकल ही त्याने चोरलेली आहे." अशी बातमी मिळाल्याने वरील सर्व स्टाफने सदर रस्त्यावर सापळा रचुन त्या के.टी.एम. मोटर सायकल वरील इसमाला ताब्यात घेतले व त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव संदेश प्रभाकर पाटोळे, वय २३ वर्षे, रा. साईराज कॉलनी, बिजलीनगर, चिंचवड, पुणे. असे असल्याचे सांगीतले तेव्हा सदरचा इसम हा वाहन चोरी करणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे लक्षात आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे तपास केला असता सदर गुन्हेगाराने चिखली पोलीस ठाणेच्या हददीमध्ये दोन वाहन चोरीचे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले असुन त्याच्या ताब्यातुन १) किं. रु. १,२०,०००/- ची एक के.टी.एम. आर.सी.-२०० कंपनीची मोटर सायकल तिचा आर.टी.ओ. क्र. एम.एच.१४/जी.आर./४९६५, २) किं.रु. १,५०,०००/- ची एक रॉयल एनफिल्ड बुलेट-३५० कंपनीची मोटर सायकल तिचे आर.टी.ओ. नं.एम.एच.१४ जे.डी.५५९९ अश्या दोन चोरीच्या माहागडया किंमतीच्या मोटर सायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

सदरची कारवाई आम्ही तसेच देहुरोड विभागाचे सहा. पोलीस आयुक्त श्री. पदमाकर घनवट, चिखली पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र बर्गे, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक, श्री. राकेश गुमाने, पोहवा.११३३/साकोरे, पोना.९६२/राठोड, पोना.१८१३/सुतार, पोना.१८५६/पिंजारी, पोना.१५४६/गायकवाड, या पथकाने केली आहे.

**( श्री. काकासाहेब डोळे, )**
**पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२**
**पिंपरी चिंचवड आयुक्तालय.**

Scanned with CamScanner